MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



धारूर / प्रतिनिधी
येथील कैप्टन राजपालसिंह हजारी इंग्लिश स्कूल या शाळेत दि.१९ रविवार रोजी वीर शिरोमणी हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांची पुण्यतिथि निमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरअध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, तालुका अध्यक्ष ड.बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा यूवा मोर्चा शहर अध्यक्ष ड.मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, मन की बात संयोजक रामप्रभु मुंडे, माजी स्विकृत नगर सेवक सचिन दुबे, युवा नेते संदीप काचगुंडे, राधाकृष्ण चोले व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१२५ | सोमवार दि.२० जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४


Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -125 | MONDAY DT.20 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# वाल्मीक कराडच्या जामिनावरील सुनावणी पुन्हा लांबली

## खंडणी प्रकरणात कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा वकिलाचा दावा

बीड / प्रतिनिधी
बीडच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडच्या जामिनावरी सुनावणी कोर्टाने आज पुन्हा एकदा लांबणीवर टाकली. आज केज कोर्टापुढे ही सुनावणी होणार होती, पण कोर्टाने ऐनवेळी ती लांबणीवर टाकली. यामुळे जामिनाच्या प्रयत्नांत असणाऱ्या वाल्मीक कराडला जोरदार झटका बसला आहे. दरम्यान, बचाव पक्षाच्या वकिलांनी खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडविरोधात कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला आहे.

वाल्मीक कराडचे वकील अशोक कवडे कोर्टाच्या सुनावणीपूर्वी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराडने खंडणी मागितल्याचा किंवा त्यांना खंडणी देण्यात आल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यांचा या गुन्ह्याशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध नाही. पण माध्यमांच्या दबावामुळे नाहक त्यांना या प्रकरणी गोवण्यात आले आहे.



वाल्मिक कराडला खंडणीच्या गुन्ह्यात १४ जानेवारी रोजी न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर आम्ही तत्काळ जामिनासाठी याचिका दाखल केली. त्यावर कोर्टाने सरकारी पक्ष व तपासी अधिकाऱ्यांचे उत्तर मागितले. सरकारी पक्षाने आपले उत्तर दाखल केले आहे. या प्रकरणी १८ जानेवारी रोजी सुनावणी होणार होती. मात्र माझी प्रकृती ठीक नसल्यामुळे ही सुनावणी आज सोमवारी होणार होती.

तपासी अधिकारी खुलासा करतील

बचाव पक्षाच्या वकिलांनी यावेळी संतोष देशमुख हत्याकांड व खंडणीच्या गुन्ह्याचा वाल्मीक कराडशी संबंध आहे किंवा नाही याचा खुलासा तपास अधिकारी करतील असेही सांगितले. संतोष देशमुख हत्या व खंडणीच्या गुन्ह्याशी वाल्मिक कराड यांचे कनेक्शन आहे की नाही? या गुन्ह्यासंदर्भात त्यांच्याकडे तसे पुरावे आहेत का नाही? हे तपासी अधिकारी कोर्टसमोर स्पष्ट करतील, असे ते म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे वाल्मीक कराडने खंडणी प्रकरणात गत ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता त्याच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे त्याला जामीन मिळणे अवघड असल्याचे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्ष न्यायालयात काय होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### आज जामिनावर होणार सुनावणी

हे प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर चालणार आहे. या प्रकरणी न्यायालयात जोरदार युक्तिवाद होईल. न्यायालय आमची बाजू ऐकून घेईल. या दोन - तीन बाबी विचारात घेऊन आम्हाला जामीन मिळेल असा अंदाज आहे. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास आहे. त्यांच्यावरील १४ गुन्ह्यांपैकी ११ ते १२ गुन्ह्यातून त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. एक ते दोन गुन्हे राजकीय आंदोलनाच्या संदर्भात परळी न्यायालयात प्रलंबित आहेत. ही यादी वाल्मीक कराड यांनी स्वतःहून दाखल केली आहे, असेही वकील अशोक कवडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# पंकजा मुंडेंच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल?

## म्हणाल्या - मी बीडची लेक, पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता



नागपूर - मी बीडची लेक आहे. मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते तर आनंद झाला असता, असे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. मी पाच वर्ष बीडची पालकमंत्री होते. त्यावेळी बीडचा चांगला विकास झाला होता. बीडची सेवा करण्याची संधी मिळाली असती, तर आनंद झाला असता, असेही त्या म्हणाल्या. पंकजा मुंडे सोमवारी नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होत्या. पंकजा मुंडे यांच्या या वक्तव्यामुळे त्यांच्या मनात बीडचे पालकमंत्रीपद न मिळाण्याची सल असल्याचे दिसत आहे.

सरकारकडून नुकतीच पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली. मंत्रीपदाप्रमाणेच पालकमंत्री पदावरून काहींना संधी नाकारण्यात आली. सर्वांचे लक्ष लागून असलेले बीडचे पालकमंत्री पद हे मुंडे बंधू-भगिनीपैकी एकालाही न देता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गेले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे नाव आल्यामुळे बीडचे पालकमंत्रीपद त्यांना देऊ नये, अशी बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांची मागणी होती. त्यामुळे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना बीडचे पालकमंत्रीपद नाकारल्याची चर्चा सुरू आहे.

मला बीडचे पालकमंत्रीपद मिळाले असते, तर मला आनंद झाला असता, अशी भावना पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली.

# घोडका राजुरीची दुर्दैवी घटना अत्यंत दु:खदायक- आ.संदीप क्षीरसागर

## मृत तरुणांच्या कुटुंबियांना १० लक्ष रूपयांची मदत जाहीर

बीड ।प्रतिनिधी
बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील पोलीस भरतीचा सराव करणार्या तीन तरूणांना एस.टी. बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. तसेच सदरील तरूण हे सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील असल्याने शासनाकडून त्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी अशी मागणीही घोडका राजुरी ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक व मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रत्येकी १० लक्ष रूपये इतकी मदत कुटुंबियांना जाहीर केली आहे.

घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करणारे ५ तरूण नेहमी प्रमाणे रविवारी (दि.५) रोजी सकाळी सराव करत असताना अचानक एस.टी. महामंडळाची बीड येथून परभणीकडे निघालेल्या बसने व्यायाम करत असणार्या या तरुणांना चिरडले त्यापैकी २ तरूणांनी बचावात उडी मारल्याने ते जखमी झाले परंतु त्यातील ३ तरूण सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (वय १९), ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे जागीच ठार झाले. पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणारे हे युवक अत्यंत सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील होते. त्यामुळे घोडा राजुरी येथील ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक यांनी मृतांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना या घटनेची माहिती देऊन या अपघातातील मृत झालेल्या तरूणांच्या कुटुंबियांना मदतीची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मृत्यू झालेल्या तीन्ही तरूणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लक्ष रूपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून मी या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी तर आहेच परंतु या कुटुंबियांच्या घरातील सदस्य म्हणून मी यापुढे त्यांच्या सुखःदुखात कायम असेल. तसेच शासनाने जाहीर केलेली मदत कुटुंबियांना मिळेपर्यंत पाठपुरावा करणार आहे यासोबतच ग्रामस्थ व नातेवाईक यांच्या मागणीनुसार कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबातही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.



सध्या शृंगेरीदेवी यात्रा उत्सव चालू असल्यामुळे रोज भावीक भक्तांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी होत असते परंतु या देवीकडे दर्शनासाठी जाताना बसची गैरसोय होत असल्याने भाविकांना अनेक वेळा तासान तास बसची उन्हात वाट बघत ताटकळत उभे राहावे लागते बसची गैरसोय होत असल्याने रस्त्याच्या कडेला उन्हात रविवारी ब्रह्मगावातील भाविक बसची वाट पाहत उभा राहिलेले भावीक फक्त यावरून आष्टी आगाराचा ढिसाळ कारभार चव्हाट्यावर घेत आहे
छायाचित्र, (सुरेश कांबळे आष्टी )




# चळवळीतला योद्धा भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभागाचा प्रदेश कार्यकारणी सदस्य

## अभावीप मध्ये पदासाठी नाही विद्यार्थ्यांना न्याय भेटावा यासाठी काम केलं

बीड ।प्रतिनिधी

विद्यार्थी चळवळीतून आपल्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीस सुरुवात करून बीड जिल्ह्यातील अत्यंत दुर्मिळ गाव खेड्यातील युवा शिक्षण घेण्यासाठी कोसो दूर जातो आणि आपल्या शैक्षणिक क्षमतेच्या बळावरती आणि समाजामध्ये परिवर्तन घडवण्यासाठी विचार करायला लागतो आणि तिथूनच सुरू होते. विद्यार्थी चळवळ आणि विद्यार्थ्यांचे अनेक प्रश्न घेऊन बाजारू शैक्षणिक संस्थांना वेठीस धरून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणे तसेच विद्यार्थ्यांची कौशल्य ओळखून त्यांना योग्य संधी कशी निर्माण करता येईल यासाठी सुद्धा अनेक प्रयत्न केले तसेच विद्यार्थी हा विद्यार्थी न राहता तो एक भारताच्या व्यवस्थेतील विचारवंत नागरिक कसा होईल यासाठीच अतोनात प्रयत्न करून कार्य केले. म्हणूनच सर्व क्षेत्रातून कौतुक तर झालेच पण इथेच न थांबता अजून पुढे जाऊन सामाजिक व्यवस्था राज्यातील असेल



देशातील असेल यामध्ये सुधारणा करण्याची ओढ लागून राहिली आणि त्यातूनच अनेक विचार या ठिकाणी उभे राहिले अशा या विचारातून नेहमी वेगवेगळ्या माध्यमातून कार्य करण्याची जिद्द चिकाटी ही कायमस्वरूपी मनामध्ये तर होतीच पण सत्यात उतरवण्यासाठी व्यासपीठाची आवश्यकता असते आणि अशी अनेक व्यासपीठ या ठिकाणी उपलब्ध होत गेली पण राजकीय सत्ता असल्याशिवाय आणि व्यवस्थित चा भाग असल्याशिवाय आपण जास्त काही करू शकत नाही यासाठीच भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभागात प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि ही दिलेली संधी या राज्यातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी कशी वापरता येईल. हाच प्रयत्न नेहमी राहणार आहे मग विद्यार्थ्यांचे प्रश्न मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस असतील यांच्यापर्यंत घेऊन जाऊन ते कसे मार्गी लागतील त्यासाठी काय करावे लागेल ते सर्व प्रयत्न आगामी काळामध्ये करणार आहे व भारतीय जनता पार्टी सारख्या जगातील सर्वात जास्त सदस्य असलेल्या पार्टीमध्ये राहून पार्टीची उंची अधिकाधिक वाढवण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये जाऊन संपर्क आणि संवादाच्या माध्यमातून आगामी काळामध्ये काम करण्याचे नियोजन आखले आहे यासाठी सर्व सहकाऱ्यांच्या माध्यमातून आणि मार्गदर्शनाने पुढील कार्य करण्याचे ठरविले असल्याने नक्कीच ठाम विश्वास आहे की भारतीय जनता युवा मोर्चा विद्यार्थी विभाग हा राज्यातील विद्यार्थी हिताचा आणि विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणाचा एक प्लॅटफॉर्म असेल हे आगामी काळामध्ये दाखविण्यासाठी पूर्ण ताकतीने भारतीय जनता युवा मोर्चातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली इथून पुढे योग्य पद्धतीने कार्य करणार आहे. तसेच भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री अनुपजी मोरे, प्रदेश विद्यार्थी विभाग संयोजक श्री रमाकांत जी कापसे यांचे मी आभार व्यक्त करतो की त्यांनी माझ्यावरती विश्वास ठेवून ही जबाबदारी दिली. देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी, राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी नेहमीच कटिबद्ध राहण्याचे वचन या ठिकाणी घेतले आहे.



# महाराणा प्रताप यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

धारूर / प्रतिनिधी

येथील कैप्टन राजपालसिंह हजारी इंग्लिश स्कूल या शाळेत दि.१९ रविवार रोजी वीर शिरोमणी हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांची पुण्यतिथि निमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा माजी नगरअध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, तालुका अध्यक्ष ड.बालासाहेब चोले, शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा यूवा मोर्चा शहर अध्यक्ष ड.मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, मन की बात संयोजक रामप्रभु मुंडे, माजी स्विकृत नगर सेवक सचिन दुबे, युवा नेते संदीप काचगुंडे, राधाकृष्ण चोले व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



आज पुरुषोतमपूरी येथे कर्मवीर एकनाथ आवाड साहेब जिजा यांना जयंती निमित विनम्र अभिवादन.

# अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवण्यासाठी बीड जिल्ह्यातील मठाधिपतींचे मोठे योगदान–माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात धार्मिक क्षेत्रात वारकरी सांप्रदाय आणि भाविक भक्त मोठ्या प्रमाणे सहभाग होऊन अध्यात्माचा वसा आणि वारसा चालवतात जिल्ह्यातील मठाधिपती संत महंत हा वसा आणि वारसा चालवण्यासाठी मोठे योगदान देतात असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

बीड तालुक्यातील मंझरी हवेली येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त रविवारी ह भ प बबन महाराज यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते त्यांच्यासोबत विलास बडगे दिनकर कदम अरुण डाके सखाराम मस्के नानासाहेब काकडे सुभाष शिरसागर नवनाथ कुलकर्णी



सर्जेराव खटाणे अर्जुन बहिरवाळ अभिमान अवचट उद्धव क्षीरसागर अर्जुन शिंदे वैभव क्षीरसागर आदी मान्यवर देखील उपस्थित होते यावेळी माऊली महाराज यांनी उपस्थितांचे स्वागत केले

यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३३ वर्षापासून मंजरी येथे अखंड हरिनाम सप्ताह अखंडपणे चालू आहे ज्ञानेश्वर माऊली महाराज हे सर्वांना बरोबर घेऊन मंजरी गावात धार्मिक उत्सव साजरे करतात आपणही समाजासाठी काही देणे लागतो या उदात्त भावनेने या ठिकाणी जे जे विकास कामे करता येतील ते करत राहिलो आज याच मंदिरात अनेक कार्यक्रम होत आहेत याचे समाधान वाटते भव्य सभागृह असल्याने या ठिकाणी लग्न समारंभ देखील मोठ्या प्रमाणात होत आहेत तन–मन–धनाने वारकरी सांप्रदाय काम करत असतो म्हणूनच तो सुखी आणि समाधानी असतो चिंतामुक्त जीवन जगण्यासाठी आध्यात्मिक विचार अंगीकारावे लागतात सध्या सोशल मीडिया आणि मोबाईल मुळे प्रत्येकाचे चित्त अस्थिर झालेले आहे यामुळेच की काय ऑस्ट्रेलिया सारख्या देशाने १८ वर्षापर्यंतच्या मुला मुलींना मोबाईल वापरावर बंदी घातली आहे एखाद्या गोष्टीचा वापर हा मर्यादित असावा लागतो त्यामुळे प्रत्येकाने याची काळजी घेतली पाहिजे. धार्मिक विचार रुजवण्यासाठी बीड जिल्ह्यात अनेक मंदिरे,गड आहेत या गडाचे मठाधिपती हा आध्यात्मिक वारसा जतन करण्याचे काम करत आहेत, बीड जिल्ह्यात त्यामुळेच धार्मिक विचाराची देवाण–घेवाण सुरू असल्यामुळे काही प्रमाणात मन माणूस आणि माणूसकी जिवंत आहे,चांगले आणि योग्य संस्कार पुढच्या पिढीला मिळावेत यासाठी धार्मिक कार्यक्रमाची गरज असते जिथे मनाला स्थिर करण्याची ताकद असते,असे सांगून त्यांनी उपस्थित भाविकांना शुभेच्छा दिल्या,प्रारंभी गावात गेल्यावर सरपंच अंबादास गुजर आणि गावकर्यांनी स्वागत केले यावेळी इंजि संतोष खटाने यांचा सत्कार करण्यात आला

# मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समितीची बैठक संपन्न

## मार्च महिन्यात धडकणार अधिवेशनावर आरक्षणासाठी आरक्षण क्रांती मोर्चा

जालना ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण अंमलबजावणी करीता अनेक वर्षांपासून अनुसूचित जाती व मातंग समाज बांधव मागणी करत असुन सदरील मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने उपवर्गीकरण आराखडा ठरविण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे या समितीला तीन महिने कालावधी देऊन सुद्धा समिती ने कोणतेही काम केले नाही तसेच शासनाने सुद्धा समीतीस सहकार्य केले नाही असा आरोप मातंग समाजाने शासनावर केला आहे तरी शासनाच्या विरुंगळा कारभारामुळे मातंग



समाजात तिव्र संताप पसरला आहे, या अनुषंगाने आज दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी शासकीय विश्रामगृहात मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती च्या वतीने बैठक पार पडली.या बैठकीत दोन महिन्यांत अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण आराखडा अहवाल बदर समिती ने सादर करुन शासनाने अंमलबजावणी केली नाही तर मार्च महिन्यात मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती च्या वतीने अधिवेशनावर मोर्चा काढण्यात येईल असे ठरले यावेळी विलास साबळे, विष्णू गवळी, संतोष निकाळजे,रवीराज पाखरे, ललित कुचेकर, अनिल साळवे, अमोल मिसाळ, रवी ईंचे, किशोर आव्हाड, किरन शिरसाठ,राम भालेराव, तरंग कांबळे, आर आर पाटोळे, ड सनी पाखरे, अरविंद शिरगुळे, विशाल शिंदे,राहुल पाखरे, दिनेश लोंढे, मोजेस सोनवणे आदी उपस्थित होते

# चुकीच्या आयात निर्यात धोरणामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हतबल झाला

## शेतीमाला संदर्भात त्रिमूर्ती सरकारचे चुकीचे धोरण सोपान काका मोरे आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

प्रतिनिधी ।शिरूर

दिनांक २० शेतकऱ्यांचा शेतीमाल तयार झाला की परदेशातून शेतीमाल सर्व प्रकारचा आयात करून आपल्या शेतकऱ्यांनी तयार केलेल्या शेती मालाचे भाव पाडून महाराष्ट्रातील शेतकरी त्रिमूर्ती सरकारने आर्थिक दृष्ट्या कमकुवत केला आहे असा गंभीर आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला आहे केंद्र व राज्य सरकारचे आयात व निर्यात धोरण शेतकऱ्यासंदर्भात चुकीचे आहे गेले चार वर्षांपासून शेतीमालाचे भाव हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी विक्री होत असल्यामुळे शासनाचे बाजारपेठ वर नियंत्रण नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवाशी आर्थिक दृष्ट्या खेळ चालू आहे यावर केंद्र व राज्य सरकारचे नियंत्रण नाही परदेशातील व्यापाऱ्याकडून संबंधित विभागाच्या प्रामुख्याला टक्केवारी दिली जाते व बाजारपेठेतील संपूर्ण भाव पाडले जातात शेतकऱ्यांच्या माल कमी दराने बाजारपेठेत विकला जातो २० २० पासून आज पर्यंत माय बाप शेतकरी बांधवांना पीक विम्याचे पैसे मिळाले नाहीत नुकसान भरपाई अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे मिळाले नाहीत विविध शेती अवजारांचे व ठिबकचे अनुदानही मिळाले नाही केंद्र व राज्य सरकारने दिलेले अनुदान व पिक विमा कंपन्याकडून हप्ते तिन्ही माजी कृषिमंत्र्यांना व संबंधित अधिकाऱ्यांनी टक्केवारी घेऊन शेतकऱ्याला फसविले असल्याचा आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला देशामध्ये व राज्यात अनेक वेळा शेतकऱ्यांनी बांधवांनी आंदोलने केली तरीही शासन गांभीर्याने दखल घेत नाही दिल्लीमध्ये तर खूप मोठे प्रचंड शेतकऱ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे ७०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आंदोलनात आत्महत्या झाल्या आहेत परंतु केंद्राने गांभीर्याने कोणतीही गोष्ट न हाताळल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाचे विरोधात राग आहे शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारने शेतीमालाला स्वामीनाथ आयोगाचा किमान आधारभूत हमीभावाचा कायद्याची अंमलबजावणी करून शेतीमालाच्या भावा संदर्भात न्याय द्यावा शेतीमाल तयार झाल्यावर निर्यात परवानगी देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांची आहे केंद्र व राज्यातील निष्क्रिय सरकार शेतकऱ्यांसाठी कर्दन काळ असल्याचा आरोप शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी केला आहे



(बीड प्र). पत्रकार शेख अमिन यांच्या विवाह प्रसंगी भेट देण्यास आलेल्या मुंबई अनुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्रीमती सना नवाब मलिक बीड नगरीत आल्या बद्दल महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने सत्कार करून करताना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख. शेख नसीर (बीड जिल्हा अध्यक्ष), राईस चाऊस(समाजसेवक). अमिन जमा

# मुख्य अणुजीवशास्त्र जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी चक्क दारूच्या रिकाम्या बाटल्यात पाण्याचे नमुणे

## पाणी तपासणीवर प्रश्न चिन्ह :- डॉ.गणेश ढवळे

बीड : बीड जिल्हा रुग्णालय आवारातील मुख्य अणु जीवशास्त्र जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी चक्क दारुच्या रिकाम्या बाटल्यांत पाण्याचे नमुने घेण्याचा गंभीर प्रकार आढळून आला असुन काचेच्या बाटल्याची गरज असेल तर किमान प्रयोगशाळा प्रशासनाने त्या बाटल्याच्या झाकणावरील टँगो, बॉबी, संत्रा असे दारूचे लेबल तरी काढून वापरण्याची गरज आहे.त्यामुळे दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्य रित्या निर्जंतुकीकरण करून वापरात घेतात की नाही? असा प्रश्न पडला असुन एकंदरीतच पाणी तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, रामनाथ खोड, शेख युनुस,सुदाम तांदळे, शेख मुबीन,शिवशर्मा शेलार, शेख मुस्ताक यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सचिव स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबई, उपसंचालक आरोग्य सेवा राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांना केली आहे.

बीड जिल्हा रुग्णालयाच्या आवारात पाठिमागील बाजूस असलेल्या पाणीतपासणी प्रयोगशाळेत चक्क देशीदारूच्या रिकाम्या बाटल्या पाण्याचे नमुणे ठेवल्याचे दिसून आले. सदरील बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करून प्रयोगशाळा प्रशासन वापरात घेत आहे का? असा प्रश्न निर्माण झाला असून त्या बाटल्याच्या झाकणावर टँगो, बॉबी, संत्रा लिहिलेले लेबल तरी काढून प्रयोगशाळा प्रशासनाने अशा बाटल्यांचा वापर करावा अशी मागणी



सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे. पाणी तपासणी प्रयोगशाळेतून जिल्ह्याच्या आरोग्याचा प्रश्न अवलंबून असतो. पाणी योग्य आहे की अयोग्य आहे या अहवालावर बीडचे नागरिक व ग्रामस्थ पाण्याचा वापर करतात. जर अशाप्रकारे दारूच्या बाटल्यात पाणी नमुणे तपासणी होत असेल तर ही बाब गंभीर आहे. प्रयोगशाळा प्रशासन या दारूच्या रिकाम्या बाटल्या योग्यरित्या स्वच्छ करत असतील का? असाही प्रश्न सर्वसामान्यांना पडला असून दारूचे लेबल पाहून पाण्याच्या तपासणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याची जिल्हाधिकार्यांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

प्राथमिक आरोग्यकेंद्र, खासगी शाळा, तसेच शहरातील हॉटेल व इतर सार्वजनिक ठिकाणी वापरात असलेले पाणीनमुणे या प्रयोगशाळेत तपासणीसाठी येतात. पाणीतपासणीवर प्रयोगशाळा प्रशासन लाखो रुपये खर्च करत असावे तसेच या पाणीनमुणे तपासणीवर लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्या दृष्टीकोनातून उपसंचालक पुणे यांनी पाणी तपासणीसाठी काचेच्या बाटल्या उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. परंतु प्रयोगशाळा प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करताना दिसत असून अशाप्रकारे देशीदारूच्या रिकाम्या बाटल्यात पाणीनमुणे तपासणीसाठी घेणे

# संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकनायक पुरस्कार

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी येथील प्रसिद्ध साप्ताहिक गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मुकुनायक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे गदरचे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

संपादक ज्ञानेश्वर लंगे यांनी अल्पावधीत गदर साप्ताहिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालून आपल्या वर्तमानपत्रात आवाज उठवला. जनतेच्या मनामध्ये गदर साप्ताहिकाने अल्पावधीत नाव कमावल आहे. या साप्ताहिकाच्या कामाची दखल घेऊन माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाने संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकुनायक पुरस्कार जाहीर केला आहे. पुढील महिन्यात मान्यवरांच्या हस्ते मुकनायक पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे अशी माहिती माजलगाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमीद, राजरत्न डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत भिलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुलकर्णी,



मार्गदर्शक प्रचंड सोळंके ,मुंजा गाडेकर, बालासाहेब उफाडे रामभाऊ यादव, रंजीत आडागळे, गणेश तौर, तेजस शिंदे, दत्ता जाधव, यांनी दिली. माहिती दिली आहे. हा पुरस्कार संपादक लंगे यांना मिळाल्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनदनाचा वर्षाव होत आहे.

# संत वामणभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर जय्यत तयारी

शिरूर कासार।प्रतिनिधी

प्रतिस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांची ४९ वी पुण्यतिथी दिनांक २१ व २२ जानेवारी २०२५ रोजी भव्य दिव्य स्वरूपात साजरी होणार आहे तेव्हा या पुण्यतिथीसाठी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर सर्व सुख सुविधाची तयारी करण्यात आली आहे तेव्हा या सोहळ्याचा लाभ महाराष्ट्रातील संपूर्ण भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या संस्थांचे महत्त्व गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज व विश्वस्तांनी केले आहे

गेली ४८ वर्षापासून हा सोळा सातत्याने वर्षभर वाढत आहे या वाढत्या नियोजनाचा आढावा घेऊन त्याप्रमाणे सर्वत्र नियोजन करण्यात आले आहे पाण्याची सोय मंडपाची सोय कीर्तन प्रवचन जागर आणि पुण्यतिथी सोहळा त्यानंतर महाप्रसाद



ही मोठ्या प्रमाणावर होणार आहे यासाठी या सर्व गोष्टीवर महंत विठ्ठल महाराज हे लक्ष ठेवून आहेत या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील तमाम ख्यातनाम दिग्गज मंडळी राजकीय सामाजिक आदी गणमान्य व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून या सोहळ्याची शोभा वाढवणार आहेत तेव्हा या सर्व सोहळ्यासाठी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर गेल्या एक महिन्यापासून रतन दिवस जय्यत तयारी चालू असून या सर्व गोष्टीवर स्वतः महंत विठ्ठल महाराज लक्ष देऊन आहेत मंगळवारी रात्री कीर्तन होणार असून बुधवारी पहाटे श्री नाथां सह संत वामनभाऊ महाराज यांच्या समाधीचा महाभिषेक होणार आहे सकाळी नऊ ते अकरा समारोपाची कीर्तन सेवा होणार असून बरोबर अकरा वाजून ४५ मिनिटांनी श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या समाधीवर पुष्पवृष्टी होऊन ४९ वी पुण्यतिथी साजरी होणार आहे यावेळी जवळपास ४०० क्विंटलचा महाप्रसाद होणार आहे दुपारी एक वाजता सर्व जमलेले भाविकांना या महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे तेव्हा या सोहळ्यात महाराष्ट्रातील तमाम भावी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शक्य तर गडाचे विश्वास त्यांनी केले आहे

## माजलगाव शहरातील शासकीय धान्य गोडाऊन ते बुखारी शाळाच्या मुख्य रस्ता परिसरात

# अस्वच्छता मुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य धोक्यात

नवीदोद्दीन सिद्दिकी यांचा दिनांक २६ जानेवारी रोजी उपोषणाचा इशारा.

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव नगर परिषदेचे दुर्लक्ष अलशी व हलगर्जीपणामुळे माजलगाव शहरातील बुखारी शाळाज्युनियर कॉलेज चे परिसरात अस्वच्छता व घाणीचे साम्राज्यामुळे बुखारी शाळेतले शिक्षक व विद्यार्थ्यांचे व येना जाना करणारे सर्व सामान्य नागरिकांचे हाल होत असून यांचे आयुष्य धोक्यात कारण बरेच महिन्यापासून माजलगाव नगरपरिषद चे साफसफाई कर्मचारी



त्या शाळा रस्ता परिसरात कोणतेच प्रकारची साफसफाई न करता उलट अख्ख्या माजलगाव शहरातली सुखा ओला कचरा घाण त्या बुखरी शाळा रोड रस्त्या परिसरात टाकून ऐन शहराच्या मध्यभागी त्या ठिकाणी कचरा टाकण्यासाठी डमी ग्राउंड सारखा पॉईंट ठिया बनवून ठेवला आहे त्यामुळे माजलगाव शहरातील नागरिक ही त्या ठिकाणी कचरा शहराबाहेर न टाकता त्याच शासकीय धान्य गोडाऊन ते बुखारी शाळा रोड परिसरात टाकत आहे ज्यामुळे सर्व सामान्य नागरिक व शिक्षक व सर्व लहान मोठे मुला मुली विद्यार्थ्यांना नरक यातायात सहन करावा लागत आहे व त्यांचे आजार हाल ही होत आहेत

# सिरसाळाकराचे राखे मुळे जिवणाचे झाले बे हाल सिरसाळा ते सोनपेठ रस्त्याच्या खड्यां मधुन जाताना दुखतेय मणक्याची गाठ

सिरसाळा ।प्रतिनिधी

दिनांक बीड परळी हावेवरी एक महत्वाचा व राजकीय दुषिटिकोनातुन महत्वाच असलेला सिरसाळा गाव सध्या सिरसाळा ते सोनपेठ रस्त्याची दुरावस्था मागील दहा वर्षापासून ते आज पर्यंत जशी तशी आहे भाजप सरकारचे दहा वर्षे व राष्ट्रवादी पालकमंत्र्याची पाच वर्षे पंधरा वर्षाच्या काला अवधूत त्या रस्त्याची अवस्था बघून जर कोणाला शिरसाळा सोनपेठ याकडे जायचं असेल तर ते परवासी पाऊलवाट कुठे आहे असं तिथल्या माणसांना विचारतात अशी या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. सध्याच्या राजकारणात बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद अजित दादा पवार यांना देण्यात आला आहे तरी दादा या रस्त्याची काही अवस्था करतात हेच आता बघाय मिळणार आहे.सध्या चालू असलेल्या मसाजोग चे सरपंच संतोष अण्णा देशमुख यांच्या निर्गुण हत्याप्रकरणी आरोपाखाली



अडकलेले परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांना पालकमंत्री पदापासून दूर केले आहे.गावातील हवा व धुळीचे व्यापली आहे आणि यामुळे या पर्यायांना ग्राहकांना व स्थानिक नागरिकांना वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्याला सामोरे जावे लागत आहे.या रस्त्यावरील धुळीच्या समस्या नेहमीच चर्चेत असतानाही शासकीय यंत्रणा यावर ठोस उपाय योजना करण्यात अपयशी ठरली आहे.

गावच्या कडेने जाणाऱ्या राज्य मार्ग आणि मुख्य बाजारपेठेतील बिघडलेले अवस्थेत धुळीचे प्रमाण वाढले आहे व रस्त्याच्या बाजूलाच वीट भट्ट्या यांची तर राग सामान्य जनतेच्या जीवनाशीफ खेळत खेळत आहे असं दिसून येत आहे.यामध्येच सामान्य जनतेला श्वासन मार्गाचे शोषण व दमा कॅन्सर घसा खवखवणे डोळ्याची जळजळ फुफुसांचे आजार यांच्या विकारांचा धोका शिरसाळकरांना उपचार करण्यासाठी बसलेली आहेत.यावरूनच सिरसाळा सोनपेठ रस्त्याची वाईट परिस्थिती पाहिली तर एखादा नवीन व्यक्ती जर त्या रस्त्याने गेला तर त्याला मणक्याचा आजार होऊ शकतो असा अंदाज सामान्य जनतेमधून दिसून येत आहे.तरी या नवीन पालकमंत्र्यांनी या रस्त्याची काळजी घेऊन या रस्ता त्वरित चालू करावा ही नागरिकांची मागणी आहे.यावरून सोनपेठ कडे जाणारे मार्ग कानडी वसंतपुर तांडा आचार्य टाकळी घोडा कवडगाव गव्हाणे कवडगाव ममदापूर बोडका सिरसाळा ते नांदेड जाणार आहेच मार्ग असल्यामुळे या रस्त्याची मागणी पूर्ण करण्यात यावी हीच विनंती सामान्य जनतेमधून मागणी केली आहे.

**परळी मतदारसंघाच्या विकास कामाची सांगता येईना कोणालाच काही मनातील बात ?**



**चित्रकलेचा निकाल १०० टक्के**

**आष्टी ।प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा चित्रकला विषयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. या शाळेतील एकूण एकवीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. एलिमेंटरी व इंटरमेजिट परीक्षेत – ड़ उ या श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळवले आहे.गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव, श्रीमती सिमा टकले, केंद्रप्रमुख जावेद पठाण, सरपंच दादासाहेब घोडके, उपसरपंच भाऊसाहेब घोडके, सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर घोडके वाहेद पठाण शालेय व्यस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले असून,मुलांना कुंडलिक काळे सर व अरूण दातार सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.**

# नोकरीच्या मागे न लागता सुरू केला स्वत:चा व्यवसाय

## सहा वर्षापासून तरुणांना देतात हक्काचा रोजगार

सुरेश कांबळे

आष्टी प्रतिनिधी

दिवसेंदिवस सुतार व्यवसाय कालबाह्य होत असला तरी वडिलोपार्जित कला जोपासत त्यात सातत्य ठेवून नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी गावातच रोजगार उपलब्ध करून घेतला आहे कष्ट व मेहनतीच्या जोरावर राज्यात नव्हे तर चार राज्यात खिळद गावच्या लाकडी चरकाचा लळा लागला आहे युवराज सोपान गोरे या तरुण व्यवसायिकांनी हे साधले आहे आष्टी तालुक्यातील खिळद येथील बीएससी शिक्षण झालेला तरुण युवराज सोपान गोरे यांनी शिक्षण घेऊन नोकरीच्या मागे न लागता वडिलोपार्जित व्यवसाय सातत्य ठेवून काहीतरी करण्याचा प्रयत्न सुरू केला शोसल मिडीयाच्या माध्यमातून लाकडी चरका बनवायला सुरुवात केली त्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून चरकाचा प्रसार केला विविध ठिकाणी विकलेला चरक पाहून इतरांकडून दिवसेंदिवस मागणी वाढत गेली राज्यातच नव्हे तर गुजरात ,हैदराबाद, राजस्थान ,आसाम, या राज्यात अनेक लाकडी चरक पाच वर्षात विक्री झाले आहेत आठवड्यात एक चरक बनवण्यासाठी साधारणतः आठ दिवसाचा कालावधी लागतो परराज्यात विकलेल्या चरखाला अडथळा किंवा एखादा पार्ट खराब झाला तर तो पार्ट ट्रान्सपोर्ट च्या माध्यमातून पुरवला जातो नवीन तंत्रज्ञान अवगत झाल्याने लाकडी सरकार सह विजेवर चालणारा चरक बनवताना अडचण येत नसली तरी दरवर्षी वाढती मागणी असते असे आहेत चरकारचे दर ४० हजार रुपये लाकडी चरक, ७० हजार रुपये विजेवर चालणारा चरक, असे सरकारचे दर आहेत गावातच आत्तापर्यंत सहा वर्षात तरुणांना हक्काचा रोजगार ते उपलब्ध करतात त्यामुळे आता त्यांचे नाव चर्चेत आहे






**कर्मवीर एकनाथजी आव्हाड साहेब यांच्या जयंती निमित्त पातरी इथे मला उत्कृष्ट शाहीर पुरस्कार देऊन सन्मानित केले त्या बद्दल आयोजक: मानवी हक्क अभियान मराठवाडा संपर्क प्रमुख मा.रघुनाथ कसबे व.भीमराव वैराळे पातरी अध्यक्ष व सर्व कमेटिचे मन:पूर्वक खुप खुप आभार**

# सय्यद नजीब मौलाना सहाब यांचे निधन; मुस्लिम समाजात शोककळा





बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर (प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाब यांचे शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.आज, रविवार सकाळी ११.३० वाजता बिंदुसरा नदी परिसरातील इजतेमा मैदान येथे त्यांची जनाजा नमाज अदा करण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य तबलीग जमातचे प्रमुख (अमीर सहाब) हाफीज मंजूर सहाब, मौलाना महेमुद सहाब, मौलाना लईक सहाब, मौलाना रईस सहाब, तसेच राज्यभरातील अलिम, मुफ्ती, मौलाना व जिल्ह्यातील मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाज अदा केल्यानंतर त्यांचा दफन विधी मासूम कॉलनी, मोमीनपुरा येथील कब्रस्तानमध्ये करण्यात आला.सय्यद नजीब सहाब यांचा जनाजा मर्कज मस्जिद, राजुरी वेस येथून काढण्यात आला. जनाजा राजुरी वेस, बशीर गंज चौक, जुने एसपी ऑफिस समोरील रोड, खासबाग रोड मार्गे इजतेमा मैदान येथे दाखल झाला.



अंबाजोगाई:युथ ऐड फाउंडेशन, पुणे, सेवा इंटरनॅशनल दिल्ली, ग्राम ऊर्जा ह्यूमन डेव्हलोपमेंट फाऊंडेशन आणि सृजन ॲग्रो टेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता एस समिट २०२५ कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. बिड जिल्ह्यात प्रथमच अंबाजोगाई येथील या कार्यक्रमात महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देणाऱ्या संकल्पना आणि सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये प्रगतशील महिला शेतकरी विद्या रुद्राक्ष, प्रसाद सिरशीकर (सेवा इंटरनॅशनल दिल्ली), दादासाहेब गायकवाड (अध्यक्ष, ग्राम ऊर्जा फाऊंडेशन, अंबाजोगाई) आणि सौ. रोहिणी भरड (शास्त्रज्ञ, केव्हीके) उपस्थित होते. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील महिलांसाठी उद्योजकतेच्या संधी, सामाजिक संस्थांचा सहभाग आणि उद्योजकतेशी संबंधित मार्गदर्शन केले.

एस समिटमध्ये उत्कृष्ट व्यवसाय संकल्पना सादर करणाऱ्या महिलांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच, उद्योगाशी संबंधित विविध बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले, ज्यात उद्योगासाठी भांडवल मिळविण्याच्या उपलब्धतेसंबंधी तसेच ऑनलाइन उत्पादन विक्री संदर्भात महिलांना सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमाच्या अंतर्गत, स्टॉलधारक महिलांनी विविध खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या वस्तू आणि इतर उत्पादने प्रदर्शित केली, ज्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. १११ ग्रामीण महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला, तर ३८ महिलांनी त्यांच्या व्यवसाय विषयक संकल्पना सादर केल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुजा घाडगे आणि शामल माळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन ग्रामऊर्जा संस्थेचे अशोक हातागळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्राम ऊर्जा फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी


# जानेवारीतच हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्याने नागरिक त्रस्त

मुंबई: जानेवारी २०२५ च्या पहिल्याच पंधरवड्यात राज्यात हिवताप, डेंग्यू व चिकुनगुन्याचा प्रादुर्भाव दिसू लागला आहे. राज्यात हिवतापाचे ४०१, डेंग्यूचे २१० तर चिकुनगुन्याच्या १३० रुग्ण आढळले आहेत.सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात जानेवारीच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये हिवतापाचे ४०१ रुग्ण सापडले आहेत. यामध्ये मुंबईमध्ये सर्वाधिक १८५ रुग्ण सापडले असून, त्याखालोखाल गडचिरोलीमध्ये १३८, रायगडमध्ये २६ आणि पनवेलमध्ये २२ रुग्ण सापडले आहेत. त्याचप्रमाणे डेंग्यूचे २१० रुग्ण सापडले आहेत.



यामध्ये मुंबईमध्ये ४४, अकोला ४१, नाशिक ३०, मालेगाव १६, सिंधुदुर्ग ११ रुग्ण सापडले आहेत. तसेच राज्यात गेल्या १५ दिवसांत चिकुनगुन्याचे १३० रुग्ण सापडले आहेत. गतवर्षी याच कालावधीत चिकुनगुन्याचे ७७ रुग्ण सापडले होते. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत जानेवारीत चिकुनगुन्याच्या रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली असल्याचे निदर्शनास येत आहे. चिकुनगुन्याचे सर्वाधिक रुग्ण हे अकोल्यात सापडले असून तेथील रुग्णसंख्या ३५ आहे तर मुंबईत १९ रुग्ण सापडले आहेत. तसेच साताऱ्यात १७ रुग्ण सापडले आहेत.

## गळ्यातील गंठण हिसकावले



अंबाजोगाई /प्रतिनिधी

मुलांना शाळेतून घेऊन घराकडे निघालेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना अंबाजोगाई शहरातील रिंग रोडवर शनिवारी (दि.१८) दुपारी घडली.

# महाकुंभ मेळ्यात अग्नितांडव

महाकुंभ मेळ्यासाठी रविवारचा दिवस भयंकर ठरला. प्रयागराजमधील सेक्टर १९ मध्ये सिलेंडरच्या स्फोटाने दुपारी आगीचा भडका उडाला. ही आग वेगाने पसरल्याने महाकुंभमधील भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ स्वत: घटनास्थळी पोहचले होते. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या घटनेची दखल घेतली.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन-तीन सिलेंडरचा स्फोट झाल्याने आग मोठ्या प्रमाणात पसरली. प्रशासनाकडून सुरक्षेच्या कारणास्तव ठिकठिकाणी अग्निशमन दलाच्या गाड्या तैनात केल्या आहेत. त्यामुळे आगीची माहिती मिळताच तातडीने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. तसेच एनडीआरएफ आणि इतर यंत्रणांकडून



बचावकार्य हाती घेण्यात आले.

तातडीने केलेल्या प्रयत्नांमुळे कमी वेळेत आग आटोक्यात आणता आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्यमंत्री योगींनीही घटनास्थळी जाऊन पाहणी केली.



# वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन,शालेय क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात -डॉ. हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात खेळ अत्यंत महत्त्वाचा असतो.या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू घडतात असे मत उदघाटक डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते पैठण येथील वसुंधरा माध्यमिक विद्यालयात क्रीडा स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलत होते. उपस्थितांच्या हस्ते नाणेफेक करून कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.प्रति वर्षी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त कै.भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी संचलित वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण मध्ये क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात.क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उद्घाटक डॉ.हनुमंत सौदागर,परमेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमध्ये बंधुता, समता,संघटन कौशल्य, शारीरिक आरोग्य, संपन्नता बौद्धिक विकास इत्यादी गुण विकसित करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.सौदागर यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना या विद्यालयातून प्रियंका इंगळे सारखे भारतीय संघाचे नेतृत्व करणारे खेळाडू निर्माण व्हावेत आणि होतील असा आशावाद व्यक्त करून क्रीडा स्पर्धेतील सर्व खेळाडूंना शुभेच्छादिल्या.मुख्याध्यापक सुशीलकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा विभाग प्रमुख अनिल सरवदे यांच्या नियंत्रणात घेतल्या जात आहेत या स्पर्धेसाठी इयत्ता पाचवी ते बारावी विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी होतात.या स्पर्धे साठी सहशिक्षक अशोक चौधरी,हनुमान चौधरी श्रीमती तोडकर ,श्रीमती डाके,नवनाथ गायकवाड, आबासाहेब बिक्कड,

# राष्ट्रशिक्षिका सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

## माजलगाव तालुक्यातील १ हाजार विद्यार्थीची संस्थेकडे नोंदणी विश्वस्त संकेत लांडगे वतीने विद्यार्थ्यांना आहवान

माजलगाव । आपला बळीराजा

क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रशिक्षिका सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेसाठी तालुक्यातून आतापर्यंत १००० विद्यार्थींची नोंदणी झाली आहे.तरी तालुक्यातील विद्यार्थींनी या सामान्य ज्ञान परीक्षेसाठी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे विश्वस्थ संकेत लांडगे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.

क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेने मागील ३ वर्षापासून या सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन केले असून यामागील संस्थेचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांना आपल्या महापुरुषाची ओळख व त्यांच्या बदलीची ऐतिहासिक माहिती कळावी हा आहे परीक्षा मध्ये बसणाऱ्या विद्यार्थींना संस्थेच्या वतीने



मी सावित्री हा ग्रंथ व परीक्षा पुर्वी सर्व विद्यार्थींना मोफत दिला जाणार असून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नोंदणी फि १०० रु आकारण्यात येणार आहे.या परीक्षेतील यशस्वी होणाऱ्या विद्यार्थींना रोख रक्कम व पारितोषिक दिले जाणार आहे.तरी दि ३१ जानेवारी २०२५ पर्यंत जास्तीत जास्त विद्यार्थींनी सहभाग नोंदवावा असे आव्हान संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.या परीक्षेसाठी प्राचार्य सानप,प्रा.संजय बागुल,के. व्ही.साळवे, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते,राहुल टाकणखार, मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर,रमेश वजीर,नामदेव भगत,वसंत टाकणखार,कपिल डोंगरे,लक्ष्मण पोटभरे,प्रभाकर साळवे, कैलास टाकणखार,प्रा.डॉ.एम.एस.वानखेडे,प्रा.सुदर्शन स्वामी, प्रा.व्हि.एस.भिसे मॅडम,प्रमोद साळवे, वाय.बी.भोसले,प्रा.राहुल कांबळे,प्रशांत जाधव,बळीराम कोरडे,एकनाथ मस्के,बाबासाहेब जाधव,प्रा.धम्मानंद बोराडे,संघर्षकुमार डोंगरे,शांतीलाल पट्टेकर,शिवाजी ससाणे,संदीप वाघमारे,सचिन कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.या परीक्षेसाठी अशोक मगर, शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, संदेश डोंगरे,दिनेश निसर्गंध,प्रविण ओव्हाळ,स्वप्नील स्वामी, सदानंदभैय्या प्रधान,आजिनाथ लोखंडे,केतन प्रधान,राज सोनवणे,संजोग कसबे,राहुल वाघमारे, डॉ.सुहास टाकणखार,दिपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निसर्गंध, सचिनदादा टाकणखार,संदेश लांडगे,रविकिरण टाकणखार, नवनाथ तोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर,विलेश कांबळे,बळीराम माने,मुंजाजी तुपसमुद्रे,राज कुमावत,नंदकिशोर निसर्गंध,रोहन टाकणखार,गब्बर ससाणे,सुहास टाकणखार,आरव जोगदंड,कपिल भाग्यवंत,ऋषीकेश सोनवणे,विशाल सोनपसारे,सुजल खळगे,दिपकदादा गायकवाड,सुबोध खळगे,रविराज भालेराव,प्रमोद भदर्गे,मिलिंद भाग्यवंत,बळीराम जाधव,सिद्धार्थ साळवे,राहुल धाईजे,मानव पोटभरे,शशिकांत घनघाव,अनिल भराटे,उत्कर्ष शिंदे, नवरत्न प्रधान, अविनाश गायकवाड,सचिन सिरसट,संघपाल साळवे,रमेश बल्लाळ,सुशिम बोराडे,बबलु फंदे, उत्कर्ष शिंदे हे परीश्रम घेत आहेत.

# परळीत अंबिका भजनी मंडळाच्या वतीने हळदीकुंकू कार्यक्रम संपन्न

परळी (प्रतिनिधी)

परळी शहरातील श्री सावळाराम मंदिर येथे अंबिका भजनी मंडळाच्या वतीने मकरसंक्रांती निमित्ताने हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि. १८ जानेवारी रोजी करण्यात आले होते. यास महिला भगिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला. जगातील सर्वात मोठ्या धार्मिक संमेलन उत्तरप्रदेश राज्यातील प्रयागराज येथील १४४ वर्षानंतरचा महाकुंभ मेळाव्याचा आकर्षक देखावा सादर केला. हा देखावा सर्वाचे लक्ष वेधले होते.

शहरातील अंबिका भजनी मंडळाच्या वतीने हळदी कुंकूवाचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. सुर्याच्या उत्तरायणाने तीळ तीळ वाढत जाणारा दिवस जेव्हापासून सुरु होतो तो मकर संक्रांतीच्या सणाचा दिवस या दिवसाचे औचित्य साधून हळदी कुंकूवाचा कार्यक्रम मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. सर्व महिलांनी एकमेकिनां मकर संक्रातीच्या शुभेच्छा देत तिळगुळ घ्या गोड गोड बोला. असा स्नेहमय संदेश देऊन नाते वृद्धिंगत केले. सर्व महिला भगिनींना हळदीकुंकवासह वाणाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गंगा, यमुना, सरस्वती देवीची पूजा करण्यात आली तसेच श्री प्रभू वैद्यनाथांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात




अंबिका भजनी मंडळाच्या हळदीकुंकू कार्यक्रमात जगातील सर्वात मोठ्या धार्मिक महाकुंभ मेळाव्याचा देखावा

केली.यावेळी आकर्षक म्हणजे, गंगा, यमुना, सरस्वती या पवित्र संगमावरती जगातील सर्वांत मोठे धार्मिक संमेलन महाकुंभ मेळावाचे आकर्षक देखावा सादर केला. यामध्ये देशभरातील विविध संप्रदायांतील लोक प्रयागराजच्या घाटावर पवित्र स्नान करतात. भाविक भक्तासाठी हा महाकुंभ मेळावा पर्वणी असल्यामुळे हा श्रद्धा, भक्ती व संस्कृतीचा सोहळा आहे. महाकुंभ मेळावा भारताच्या शाशवत आध्यात्मिक वारशाचे प्रतीक आहे. विविधतेतील एकतेचे दर्शन मेळाव्यातून होते म्हणून ह्या श्रद्धा, भक्ती व संस्कृतीचा सोहळा असणाऱ्या महाकुंभ मेळाव्याचे देखावा अंबिका भजनी मंडळाच्या सादर केला होता. हा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.यावेळी आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. यास महिला भगिनींणा मोठा प्रतिसाद मिळाला. हा कार्यरत यशस्वी करण्यासाठीअंबिका भजनी मंडळाच्यासर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रावर बारदाना अभावी सोयाबीन खरेदी केंद्र बंद केज तालुक्या तील शेतकरी चिंतेत

केज/प्रतिनिधी

राज्य सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाने खरेदी करण्या साठी खरेदी केंद्र उपलब्ध करून दिले.ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाल्या. बारदाना उपलब्ध नसल्याने सोयाबीनखरेदी केंद्र बंद आहेत.खरेदीकेंद्र कधी सुरू होणार म्हणून शेतकरी चिंतेत आहेत. तात्काळ खरेदी केंद्र सुरू करा अशी मागणी केली जात आहे.केजतालुक्यात चिंचोली माळी,होळ, बनसारोळा,नांदुरघाट ही राज्य सरकारची अधिकृत हमीभाव खरेदीकेंद्रआहेत

युसूफवडगाव येथील खरेदी केंद्र हे महाकिसान संघाचेआहे.वडगावयेथील खरेदी केंद्राने स्वतः बारदाना खरेदी करून खरेदी चालू ठेवलेली आहे तर इतर खरेदी केंद्रात खरेदी बंद आहे.शासना कडे वारंवार मागणी करूनही बारदान उपलब्ध होत नाही.ऑनलाइन नोंदणी करून शेतकरी चकरा मारत आहेत. प्रत्येक सोयाबीन खरेदी केंद्राकडे दोन ते अडीच हजार शेतकऱ्यांनीनोंदणी केलेली आहे.खाजगी खरेदी केंद्रावर बाजार भाव ४१५० आहे तर शासनाने जाहीर केलेला हमीभाव



शेतकऱ्यांवर संकट,अल्प दराने खाजगी केंद्रावर सोयाबीन विक्रीची वेळ

४८९२ रुपये आहे.शेतकरी नोंदणी करून मॅसेजची वाट बघत आहेत तर मॅसेज आलेल्या शेतकऱ्यांनाही बारदाना उपलब्ध नसल्याने खरेदी केंद्र बंद असल्याचे सांगितले जाते एकीकडे दि.३१ जानेवारी पर्यंत खरेदी पूर्ण करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिले आहेत आणि अद्याप खरेदी केंद्र सुरूच नाहीत यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे.सोयाबीन मळणी करून अडीच महिन्याचा कालावधी उलटून गेला माल विक्रीसाठी तयार आहे.मात्र शासन धोरण हे कुचकामी ठरत आहे

शेतकऱ्यांनी खाजगी सावकार,उधार देणारे कृषी दुकानदार विविध ठिकाणावरून उधारीवर घेतलेले खते बियाणे याचे या पैशाचा तगादा सुरू आहे.हमीभाव केंद्र केवळ नावालाच आहेत. शेतकऱ्यांना नाईलाजाने सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विक्री करावी लागत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT